आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२३ मे २०२४ - गुरुवार

वैशाख पौर्णिमा म्हणजेच बुद्ध पौर्णिमा आज देशाच्या विविध भागात साजरी होत आहे. भगवान बुद्धांचा जन्मदिवस आणि त्यांच्या ज्ञान प्राप्तीचा हा दिवस त्यांच्या शिकवणीचं स्मरण करुन साजरा करण्यात येत आहे.  तथागत गौतम बुद्धांशी संबंधित स्थळांवर भाविकांची गर्दी झाली असून विविध ठिकाणी बुद्धमूर्तीच्या मिरवणुका काढण्यात आल्या आहेत. तसंच विशेष प्रार्थना आणि प्रवचन कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने हिंगोली शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा येथून रॅली काढण्यात आली.  अनेक भंतेंसह  शुभ्र वस्त्र परिधान केलेले उपासक ,उपसिका मोठ्या संख्येने  रॅलीत सहभागी झाले होते.

**<><><><><>**

लोकसभेच्या सहाव्या टप्प्यातला प्रचाराचा आज शेवटचा दिवस. या टप्प्यात उत्तर प्रदेशाच्या १४, हरयाणाच्या  १०, हिमाचल प्रदेशाच्या  ४, बिहारच्या ८, आणि उत्तराखंडमधे ८, ओदिशातल्या ६  अशा एकूण ५७ मतदारसंघांमध्ये येत्या शनिवारी मतदान होणार आहे. याखेरीज जम्मू काश्मीरमध्येही अनंतनाग-राजौरी मतदारसंघात शिल्लक राहिलेलं मतदान शनिवारी होणार आहे. या ५८ जागांसाठी एकोणनव्वद उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

**<><><><><>**

सातव्या आणि अखेरच्या टप्प्यात देशातल्या ५७ मतदारसंघांमधे येत्या  एक जूनला मतदान होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी मतदारसंघाचा त्यात समावेश आहे. या टप्प्यातल्या प्रचारालाही जोर आला असून विविध नेत्यांच्या जाहीर सभा होत आहेत.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि करवीरचे  आमदार पी. एन. पाटील  यांचं आज पहाटे  निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते. पी. एन. पाटील यांनी आपल्या राजकीय

कारकिर्दीची सुरुवात काँग्रेसमधून केली. १९७८ ते १९८५ या काळात जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केलं. त्यानंतर जिल्हा अध्यक्ष, प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष अशा जबाबादाऱ्याही त्यांनी सांभाळल्या. त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी काँग्रेस समिती कार्यालयात ठेवलं होतं. पी एन पाटील यांच्यावर त्यांच्या गावी सडोली खालसा इथं सरकारी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. पी. एन. पाटील यांच्या जाण्याने एक सहृदयी नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले असल्याची भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली, तर पी एन पाटील यांच्या निधनाने कोल्हापूरच्या सामाजिक, राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तीव्र दु:ख व्यक्त करुन श्रद्धांजली वाहिली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी पाटील यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

डोंबिवलीत एमआयडीसी भागात आज दुपारी एका रासायनिक कंपनीत स्फोट झाला. या दुर्घटनेत पाच कामगार जखमी झाले. दोघांवर महापालिकेच्या रुग्णालयात तर तिघांजणांवर एम्स रुग्णालयात उपचार सुरु आहेत. हा स्फोट बॉयलरचा असावा असा प्राथमिक अंदाज आहे. कल्याण महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या सहा तर ठाणे अग्निशमन दलाच्या तीन गाड्या स्फोटांनंतर लागलेली आग आटोक्यात आणत आहेत. ठाणे जिल्ह्याचं आपत्ती निवारण पथकही घटनास्थळी रवाना झालं आहे.

**<><><><><>**

अहमदनगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यात सुगाव जवळ प्रवरा नदीत नाव उलटून झालेल्या दुर्घटनेत एनडीआरएफ च्या पथकातील ३ जवानांचा बुडून मृत्यू झाला आहे. नावेतील आणखी एक जवान आणि एक स्थानिक अद्याप बेपत्ता आहेत. प्रवरा नदीच्या सुगावजवळ काल संध्याकाळी दोघेजण बुडाले होते. त्यातील

एकाचा मृतदेह काल काढण्यात आला. आज सकाळी दुसऱ्या व्यक्तीच्या मृतदेहाचा शोध घेतांना ही दुर्घटना घडल्याची माहिती राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

**<><><><><>**

मुंबईत घाटकोपर इथं जाहिरात फलक दुर्घटनेत जखमी झालेल्या आणखी एका रुग्णाचा केइएम रुग्णालयात उपचार सुरु असताना मृत्यू झाला. या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या आता १७ झाली आहे. या दुर्घटनेत जखमी झालेले १० रुग्ण अद्याप पालिकेच्या रुग्णालयात उपचार घेत आहेत.

**<><><><><>**

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये १० पुर्णांक ६७ शतांश टक्के पाणीसाठी शिल्लक आहे. सध्या वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ होऊन पाणीपातळीत वेगाने घट होत आहे. अशा परिस्थितीत मान्सून वेळेवर आला नाही तर पाणीकपात करावी लागेल तेव्हा नागरिकांनी पाणी जपून वापरावं, असं आवाहन बृहन्मुंबई महापालिका जल विभागाने केलं आहे.

**<><><><><>**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात काल संध्याकाळी झालेल्या अवकाळी पावसामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला.

येत्या दोन दिवसात राज्यातल्या चारही विभागांमध्ये तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. दरम्यान, विदर्भात उष्णतेची लाट कायम असून राज्यात काल सर्वाधिक ४४ अंश सेल्सिअस तापमान अकोला इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात परभणी इथं ४३ पूर्णांक चार, बीड ४३ पूर्णांक एक, तर छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड इथं ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

//<><><><><><>//